**विशेष दिवाणी मुकदमा नं.३२/२००७ मधील निशाणी २७९ वरील आदेश**

**विक्रमसिंह देशमुख विरुध्द दिलीप शिंदे**

(**CNR No.MHSN**050014452007)

१. प्रस्तुत अर्जाद्वारे वादीने त्याच्या कथनाच्या पुष्ठयर्थ साक्ष देण्यासाठी साक्षीसमन्स काढण्याची विनंती केली आहे.

२. वादीचे कथन की, दावा दाखल झाल्यापासून ते २०२३-२४ पर्यंत प्रतिवादी क्र.४ व प्रतिवादी क्र.५ हे कृष्णानगर सर्व सेवा सोसायटी यांच्याकडून पीक कर्ज घेत आहेत. त्यांनी दिनांक ०७.१०.२०२३ रोजी देखील सदर सोसायटीमधून रक्कम रुपये ६,००,०००/- पीक कर्ज घेतलेले आहे. सदरची वस्तुस्थिती कोर्टासमोर येणे पुराव्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. करीता सदर सोसायटीतर्फे सचिव अथवा माहीतगार इसम यांना साक्षीसमन्सचा हुकूम करण्यात यावा. त्याचप्रमाणे वादी यांना राजारामबापू पाटील सह साखर कारखाना, तसेच सर्वोदय युनिट यांच्याकडून दिनांक १८.०२.२०१२ ते १६.०३.२०१७ व तदनंतर देखील गाळपास गेलेल्या उसाचे बील सांगली जिल्हा मध्यवर्ती सह बँक लि. आष्टा (चव्हाणवाडी) येथील शाखेतील त्यांच्या खात्यावर जमा झाले आहे. त्यामुळे सदर उस बील जमा झालेचे रेकॉर्ड पुराव्याकामी मे. कोर्टासमोर येणे आवश्यक आहे. करीता शाखाधिकारी तथा माहीतगार इसम, सांगली जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा चव्हाणवाडी, आष्टा यांना साक्षीसमन्सचा हुकूम करण्यात यावा. त्याचप्रमाणे सांगली जिल्हा मध्यवर्ती सह बँक, शाखा कारंदवाडी, ता. वाळवा येथील वादी यांचे खाते नं.६१७१ यावर राजारामबापू सह साखर कारखाना सर्वोदय

युनिट यांचे देखील ऊस बिल जमा होत होते. त्यासाठी सदर बँकेचे शाखाधिकारी तथा माहीतगार इसम यांना साक्षीसमन्सचा हुकूम करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र.२, ३ व ५ यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास ठाम विरोध दर्शविला. प्रस्तुत प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे दावा केल्यानंतरचे कागद व निर्माण केलेला पुरावा सादर करण्याचा वादीचा प्रयत्न आहे. वादीला असा कोणताही कागद मागण्याचा अधिकार किंवा साक्षीसमन्सची मागणी करण्याचा अधिकार नाही. करीता अर्ज रद्द करण्यात यावा.

४. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले.

५. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हक्कज्ञापन होवून मिळण्यासाठी व दावा जमीनीतील वादीच्या शांततामय वहीवाटीस प्रतिवादी अगर तर्फे इसमांनी हरकत करु नये, तसेच त्रयस्त इसमांचे हक्कसंबंध निर्माण करु नयेत अशा कायम मनाई हुकूमाकरीता दाखल केलेला आहे. वादी यांच्या युक्तीवादाप्रमाणे दावा मिळकती त्यांच्या कब्जेवहीवाटीत असून वादी यानी सदर दावा मिळकतीमधील ऊस पीक गाळपास साखर कारखान्यास पाठविले त्याचे देयक वादीच्या खात्यात जमा झालेले आहे. तसेच ऊस पिकासाठी कर्ज घेतलेले आहे. या सर्व बाबी सिध्द करण्याकरीता आवश्यक पुरावा नोंदविण्यास कागदपत्रे दाखल करण्याकामी व तोंडी पुरावा नोंदविण्यासाठी संबंधीताना साक्षीसमन्स काढणे आवश्यक आहे.

६.		प्रतिवादीने युक्तीवाद केला की, संबंधीत कथने दावा दाखल केल्यानंतरची आहेत. त्यामुळे सदर दस्तांचा पुरावा म्हणून विचार करता येत नाही.  करीता अर्ज विनाकारण असल्याने फेटाळण्यात यावा.

७.		वर नमूद केल्याप्रमाणे दावा ज्ञापन व मनाई हुकूमासाठी आहे. वाद मिळकतीतील केवळ हक्क नाहीतर ताबा हा सुध्दा वाद विषय आहे. त्यामुळे वादीस त्याच्या कथनाच्या पुष्ठयर्थ आवश्यक पुरावा नोंदविण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. प्रतिवादीने सदर कागदपत्रे दावा दाखल केल्यानंतर अस्तीत्वात असल्याने पुराव्यात वाचता येत नसल्याचे सांगितले आहे. परंतु एखादा दस्त पुराव्याकामी विचारार्थ घेणे योग्य किंवा अयोग्य असल्याबाबतचा निष्कर्ष पुरावा नोंदविल्यानंतर अंतिमतः काढणे संयुक्तीक आहे. त्यामुळे जर वादीचा अर्ज फेटाळला तर त्यास पुरावा देण्यापासून वंचित केले अशी परिस्थिती होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याउलट जर साक्षीदारास कागदपत्रांसह साक्षीला बोलविण्यामुळे कोणत्याही पक्षाला गैरफायदा किंवा गैरहानी पोहचण्याची शक्यता नाही. साक्षीदाराने नोंदविलेल्या पुराव्याबाबत उलटतपास घेण्याची प्रतिपक्षास आपोआप संधी निर्माण होते. करीता अर्ज मंजूर होणे योग्य व आवश्यक आहे. अनुषंगिकरित्या खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## **आदेश**


१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. सचिव अथवा त्यांच्यातर्फे माहीतगार इसम, कृष्णानगर सर्व सेवा सोसायटी कृष्णानगर यांना प्रस्तुत दाव्यामध्ये साक्ष देण्याकरीता उपस्थित रहावे म्हणून साक्षीसमन्स काढण्यात यावे. सदर साक्षीदार यांनी साक्षीस येताना उदयसिंह यशवंतराव व धैर्यशील उदयसिंह देशमुख यांना सन २००७ ते २०२३–२०२४ अखेर अदा केलेल्या कर्जाचा कर्ज मागणी अर्ज, अदा केलेली रक्कम, दिनांक, वार यासह तपशिलात माहीती घेवून साक्षीस हजर रहावे.

३. शाखाधिकारी तथा त्यांच्यातर्फे माहीतीगार इसम, सांगली जिल्हा मध्यवर्ती सह बँक शाखा, चव्हाणवाडी, आष्टा यांना प्रस्तुत दाव्यामध्ये साक्ष देण्याकरीता उपस्थित रहावे म्हणून साक्षीसमन्स काढण्यात यावे. सदर साक्षीदार यांनी साक्षीस येताना विक्रमसिंह देशमुख यांच्या खाते नं.९८९४ वर राजारामबापू साखर कारखाना तसेच सर्वोदय युनिट कारंदवाडी यांच्याकडून दिनांक १८.०२.२०१२ ते १६.०३.२०१७ व तदनंतर देखील गाळपास गेलेल्या उसाचे बील जमा झालेचे रेकॉर्ड, स्टेटमेंट प्रमाणपत्रासह सर्व कागदपत्रे घेवून साक्षीकरीता हजर रहावे.

४. शाखाधिकारी तथा त्यांच्यातर्फे माहीतीगार इसम, सांगली जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा, कारंदवाडी, ता. वाळवा यांना प्रस्तुत दाव्यामध्ये साक्ष देण्याकरीता उपस्थित रहावे म्हणून साक्षीसमन्स काढण्यात यावे. सदर साक्षीदार यांनी साक्षीस येताना विक्रमसिंह देशमुख यांचे खाते नं.६१७१ वर दिनांक २४.०२.२०१५ ते ०३.१०.२०१८ अखेर राजारामबापू सह साखर कारखाना सर्वोदय युनिट यांच्याकडून जमा झालेल्या ऊस बिलाच्या रक्कमेचे स्टेटमेंट प्रमाणपत्रासह व या खात्याच्या अनुषंगाने असणारी माहीती घेवून साक्षीकरीता हजर रहावे.

५. वादी यांनी नियमानुसार साक्षीभत्ता भरल्यानंतर साक्षीसमन्स काढण्यात यावे.




Digitally signed by
MUKUL MADHUSUDAN
CHITALE
Date: 2025.01.24
16:36:48 +0530

**इस्लामपूर.** **(मुकुल म. चितळे)**

**दिनांक – १८.०१.२०२५** **दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, इस्लामपूर.**

## <u>प्र मा ण प त्र</u>

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | सतिश कृष्णा पाटील, |
| कोर्टाचे नाव | – | दुसरे सह दिवाणी न्यायालय व. स्तर, इस्लामपूर. |
| आदेश घोषीत दिनांक | – | १८.०१.२०२५ |
| पी.डी.एफ/अपलोडचा दिनांक | – | २४.०१.२०२५ |